प्रकरण चौथे

# तात्यासाहेब कोरे यांचे शैक्षणिक कार्य

❊ प्रकरण चौथे ❊

# तात्यासाहेब कोरे यांचे शैक्षणिक कार्य

**प्रस्तावना :-**

माणसाचे जीवन यशस्वी होण्यासाठी ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे शिक्षण ही अधिक पटीने महत्त्वाची गरज आहे. शिक्षणामुळे प्रत्येक माणसाला आपला सर्वांगिण विकास करण्यास आधार काठी आहे. मानवी जीवन सुखी, समृद्ध बनवायचे असेल, तर प्रथम प्राधान्य शिक्षणाला दिले जाते. सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात माणसाचा विकास झाला तरी, त्याचा नैतिकदृष्ट्या विकास होण्यासाठी सांस्कृतिक विकासातील शिक्षण हा एक महत्त्वाचा संस्कार मानला जातो. शिक्षण संस्काराने त्या माणसामध्ये मोठा आत्मविश्वास निर्माण होतो. विश्वातील प्रत्येक घटकांचे ज्ञान प्राप्त करता येते. व्यावहारिक जीवन जगताना नेहमीच शिक्षणाचा आधार मिळतो. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

कोणत्याही व्यक्तीचे जीवन हे संस्कारावर आधारित असते. मुळात सर्व मानव सारखेच, पण ज्या व्यक्तीवर चांगले संस्कार लहान वयातच होणे गरजेचे आहे. त्यासाठी घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीचे जितके महत्त्वाचे स्थान आहे. त्यापेक्षा जास्त महत्त्व शिक्षकाला आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षकांची भूमिका फार महत्त्वाची असते. कारण लहान मने ही मातीच्या आकाराची असतात. ज्या पद्धतीने मातीला योग्य आकार देऊन त्यापासून चांगली मूर्ती बनवता येते, त्याच पद्धतीने ह्या लहान मुलांना वळण देईल तसे संस्कार घडत असतात. कोणत्याही यशस्वी व्यक्तीचे चरित्र पाहिल्यास त्याच्यावर लहानपणी ज्या शिक्षकांने संस्कार केले त्यांचा फार मोठा प्रभाव असतो. याठिकाणी शिक्षकांचे कार्य शाळेपुरतेच मर्यादित न धरता व्यापक अर्थाने त्याचा विचार केला तर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

गुरू-शिष्य हे नाते फार महत्त्वाचे असते. गुरूचा प्रभाव शिष्यावर पडलेला असतो. छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श राजे आहेत. त्यांच्यावर संस्कार करणारे दादोजी कोंडदेव व जिजामाता यांचा प्रभाव होता असे दिसून येते. म्हणजे कोणत्याही व्यक्तीला चांगले शिक्षण मिळाले की, ती व्यक्ती प्रभावी ठरते, त्यांचे कार्य यशस्वी होते. सर्वच व्यक्तींना चांगले संस्कार, चांगले शिक्षण मिळालेकी ती व्यक्ती आदर्श होतेच असे नाही. त्यासाठी काही अंगभूत गुणही आवश्यक आहेत. ह्या अंगभूत गुणांना योग्य वळण देण्याचे काम शिक्षक, गुरू करत असतात.

तात्यासाहेब विद्यार्थी दशेत असताना घरातील मंडळींचे संस्कार झाले. आण्णा म्हणजेच त्यांचे वडील आणि दादा चुलते यांचा प्रभाव त्यांच्यावर झाला. त्या दोघांच्याकडून त्यांनी एक गोष्ट घेतली ती म्हणजे 'जीवनात कष्ट हे फार महत्त्वाचे आहेत.' कष्टाशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नाही. तसेच कष्टाला पर्याय नाही. असा महान संस्कार तात्यांच्या बालमनावर झाला. याचा उपयोग भावी आयुष्यात त्यांना झाला. त्याच पद्धतीने श्रीधरपंत कुलकर्णी गुरूजी यांनी शाळेत असताना त्यांच्या मनावर बिंबवलेले संस्कार हेही तितकेच महत्त्वाचे आहेत. श्रीधरपंत कुलकर्णी हे कोडोलीत इंग्रजी शाळा चालवीत होते. १९२७ साली कोडोली सारख्या ग्रामीण भागात इंग्रजी शाळा चालवणे फार कठीण काम होते. शासनाचे कोणतेही अनुदान नव्हते, समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार नव्हता. अशा बिकट परिस्थितीत ही शाळा चालवण्याचे काम कुलकर्णी गुरूजी करत होते. त्या काळात वर्तमानपत्र, वीज, रेडिओ, वहाने यांचा अभाव असलेल्या कोडोली गावात हे गुरूजी अनेक प्रकारची माहिती देत असत. त्यांचे इंग्रजी, संस्कृत भाषेतील ज्ञान फार मोठे होते, वक्तृत्व प्रभावी होते. अशा गुरूजींच्या हाताखाली तात्यासाहेब व त्यांचे बंधू दिनकर हे शिक्षण घेत होते. हे गुरूजी राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रभक्ती या विषयावर खूप बोलायचे. शालेय शिक्षणाबरोबर व्यावहारिक शिक्षणही देत. त्यामागचे महत्त्व समजावून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

सांगत असत. 'मोठ्या त्यागातून मोठी कार्ये जन्म घेतात' हा त्यांच्या विचारातून सार निघत असे. जीवनाला शिस्त असली पाहिजे, कोणतेही काम कशासाठी करत आहे असा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारला पाहिजे. असा सल्ला श्रीधरपंत कुलकर्णी गुरूजी विद्यार्थ्यांना देत असत. अशा गुरूजींच्या हाताखाली तात्यासाहेबांनी शिक्षण घेतल्यामुळे त्यांचे फायदे त्यांना भावी आयुष्यात झाले.

तात्यासाहेब कोरे यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करताना त्यांच्यावर झालेले संस्कार हे त्यांच्या शैक्षणिक कार्यातून जाणवतात. शिक्षणाचे खरे ध्येय शिक्षित विद्यार्थी हा सुसंकारित नागरिक झाला पाहिजे. तो राष्ट्रसेवक असा 'नवा माणूस' जन्माला आला पाहिजे. या सर्व ध्येयांचा विचार करता त्या विद्यार्थ्यांच्या अंगी मानवतावादाचे संस्कार होणे हे ही तितकेच महत्त्वाचे आहे, असा विचार तात्यासाहेब कोरे यांचा आहे. याचबरोबर त्यांचे मत असे आहे की, "विद्यार्थ्याला विश्वाच्या विविध क्षेत्रातील घडामोडींचे सर्वसामान्य ज्ञान तर अभ्यासक्रमातून मिळाले पाहिजेच, पण त्याच वेळी त्याला 'विश्व नागरिकत्वाचे' संस्कारही या अभ्यासक्रमातून लाभले पाहिजेत."[१] असे उच्च विचार मनात उत्पन्न करून त्यांचे वास्तव रूपांतर उतरविणारे तात्यासाहेब कोरे हे एक ग्रामीण भागातील शिक्षण संस्थापक आहेत. तात्यासाहेब कोरे यांच्या शैक्षणिक विचार या कार्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा प्रभाव पडलेला जाणवतो. तसेच विनोबा भावे यांचे विचारही त्यांच्यावर प्रभाव टाकतात. त्यांचे विचार व्यक्त करताना तात्यासाहेब कोरे म्हणाले, "सर्व राष्ट्राचे केवळ........भय खात्यासाठी.....अब्जावधी रूपये खर्च होत आहेत, ते दारिद्रया विरूद्धच्या लढाईत वापरले जातील मग या विश्वाचा एकही नागरिक उपाशी राहणार नाहीत तो माणवासारखा जगू शकेल."[२] असे असले तरी तात्यासाहेब कोरे यांच्या एकूण जीवनावर महात्मा गांधीजींच्या विचाराचा प्रभाव होतो. कारण ज्यावेळी

तात्यासाहेब तारूण्य अवस्थेत होते त्यावेळी म्हणजे १९२० ते १९४७ या काळात संपूर्ण देशावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. तात्यासाहेब हे गांधीजींच्या विचाराने प्रभावी झालेले होते, त्यामुळे गांधीजींच्या शैक्षणिक विचारातही त्यांचा प्रभाव होता. गांधीजींच्या मते हृद्य, मन व शरीर मिळून बालकाचे समग्र व्यक्तिमत्व बनते. म्हणून शारीरिक, अध्यात्मिक व बुद्धीचा विकास समान गतीने होण्यावर त्यांनी भर दिला. शिक्षणातून व्यक्ती स्वावलंबी झाली पाहिजे व समाजाची गरज भागली पाहिजे. पण आपल्या देशातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहते, त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे या मताचे गांधीजी होते. ग्रामीण मुला-मुलींना शिक्षण मिळणे गरजेचे आहे. शिक्षणाशिवाय खेडेगावांची प्रगती नाही. आणि ग्रामीण भाग सुधारल्याशिवाय देश सुधारणार नाही. म्हणून प्रथम ग्रामीण भागात शिक्षण देणे जास्त गरजेचे आहे. समाजव्यवस्थेमध्ये असलेली मोठ्या प्रमाणात जातीयता नष्ट करण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. ज्यावेळी व्यक्तीची शिक्षणामुळे वैचारिक पातळी वाढेल, तेंव्हाच समाज व्यवस्थेतील दुजाभाव नष्ट होईल. शिक्षणाशिवाय व्यक्तीची प्रगती नाही. आचारात-विचारात बदल नाही. त्यामुळे शिक्षणास गांधीनी महत्त्व दिले होते.

भरपूर लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात राहणीमान वाढावे व बेकारीही रोखता यावी. यासाठी लघु-उद्योगावर गांधीजींनी भर दिला. शाळातून केवळ पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा उद्योग व्यवसाय शिकविल्याने विद्यार्थी स्वावलंबी बनू शकतील व जीवन आणि शिक्षण यांचा संबंध जोडला जाईल. असे गांधीजींचे शिक्षण विषयक विचार होते. या विचारांचा तात्यांच्यावर प्रभाव पडला होता. त्यामुळेच ग्रामीण भागात इंग्रजी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९४६ साली कोडोली हायस्कूलची स्थापना केली. त्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचे अनुकरण १९६४ साली वारणा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने वारणा विभाग शिक्षण मंडळाची स्थापना केली.

वसतिगृह युक्त शिक्षणाची सोय केली. त्यामुळे ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय झाली. शिक्षण केवळ पुस्तकी असू नये. यासाठी १९८३ साली अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन केले. औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आय. टी. आय.) स्थापन केले, या महाविद्यालयातून दरवर्षी अनेक विद्यार्थी पदव्या घेऊन बाहेर पडल्याने बेकारी वाढणार त्यामुळे १९८४ साली ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटरची स्थापना केली. या संस्थेचा उपयोग वारणा परिसरातच लघू उद्योग स्थापन होण्यास मदत झाली. गांधीजींना अभिप्रेत असणारे शिक्षण देण्याचे काम तात्यासाहेबांनी ग्रामीण भागात केले. त्यामुळेच आज वारणा परिसर शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध झालेला आहे.

तात्यासाहेब कोरे यांच्या स्वत:च्या शिक्षणामध्ये अनेक अडचणी आल्या होत्या. कुलकर्णी गुरूजींची कोडोली गावातील शाळा बंद पडली, पुढील शिक्षणासाठी तात्यांना सांगली या ठिकाणी शाळेला घातले, तेथे त्यांचे चांगले मन रमले. कांही जीवाभावाची मित्रमंडळी मिळाली. पण अचानक चुलत्याच्या निधनाने घरी अडचणी येऊ लागल्या. घरातील व्यापार सांभाळण्यासाठी कोणी नव्हते. वडीलांनी भावाच्या मृत्यूमुळे जीवनाला लावून घेतले, त्यांचीही तब्येत खालावू लागली. अशा परिस्थितीत तात्यांना शिक्षण बंद करावे लागले, शाळेतील बाकावरून दुकानाच्या तराजुवर यावे लागले. घरचा व्याप सांभाळत होते, कारण घरातील सर्वांत मोठे बंधू होते. शिक्षण बंद झाले, शिकण्याची इच्छा असूनसुद्धा शिकता आले नाही. ही गोष्ट त्यांच्या मनाला बोचत होती. अशी परिस्थिती दुसऱ्यावर येऊ नये असे त्यांचे मत होते. पुढील काळात घरचा व्याप सांभाळत सामुदायिक कार्याकडे वळले होते.' मुळातच त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. जवळ असणारे मित्रही त्याच वृत्तीचे असल्यामुळे त्यांनी सुरूवातीला सेवा सोसायटीच्या कार्यात भाग घेतला. येथे जे काम केले ते त्यांना त्यांच्या जीवनाची दिशा देणारे ठरले. आपल्या हातून सुद्धा काही चांगली कामे होऊ शकतात

असा त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. पुढे कोडोलीचे नगराध्यक्ष झाले. अशा प्रकारे त्यांच्या सामुदायिक कार्याला सुरूवात झाली होती. हळूहळू त्यांचे नेतृत्त्व चमकू लागले. त्यांच्याकडे असणारे अंगभूत गुण दिसू लागले, त्यामुळे कोडोली गावातील मित्रमंडळी तसेच जाणकार व्यक्तीही तात्यांचा सल्ला घेऊ लागली. अशा परिस्थितीत कोडोली गावांत काही सुधारणा होऊ लागल्या होत्या, पण मनुष्याला संस्कार घडणारे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण, हे शिक्षण कोडोली या ठिकाणी मिळत नव्हते त्याची कमतरता भरून काढण्यासाठी कोडोलीत शिक्षणाची सोय व्हावी म्हणून तात्यासाहेब विचार करत होते.

**तात्यासाहेब कोरे यांच्या ग्रामीण नेतृत्वातील पहिले शैक्षणिक कार्य :-**

तात्यासाहेब कोरे यांच्या हातून स्वतंत्ररित्या पहिले कार्य म्हणजे कोडोली हायस्कूलची उभारणी. त्यानंतर त्यांनी १९६४ मध्ये वारणा विभाग शिक्षण मंडळाची स्थापना केली. पण त्यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करत असताना त्यांचे सुरूवातीचे कार्य म्हणजे हायस्कूलची उभारणी. १९४०-१९५४ हा उमेदीचा काळ त्यांनी शैक्षणिक कार्यासाठी खर्च केला. कुलकर्णी गुरूजींनी चालू केलेली इंग्रजी शाळा बंद पडली. कारण गुरूजींचे आणि गावकऱ्यांचे काही गोष्टीत पटले नाही. गुरूजी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मोठी शिक्षा देत असत त्यामुळे ते पालकांना आवडले नाही, त्यामुळे ही इंग्रजी शाळा बंद झाली. पुढे श्री धोंडोपंत हणमंत कुलकर्णी कोडोलीत इंग्रजी शाळा चालवत होते. या शाळेचे नांव मॉडेल इंग्लिश स्कूल होते. या शाळेत २५ त ३० विद्यार्थी होते. ही शाळा केवळ नावापुरतीच चालत होती. गावकऱ्यांचा सहभाग फारसा नव्हता. परंतु शिक्षणाबाबत तात्यासाहेब म्हणतात की, "कोणत्याही शिक्षणाची गंमत ही असते की त्यांची लांबी, रूंदी नि व्याप्ती शिक्षकाच्या आकाराप्रमाणे असते. श्रीधरपंतासारख्या जबरदस्त आकाराचा गुरू पुनश्च कोडोलीत आला नाही. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचा

गाडा, पांगुळगाडा बनून संथ गतीने पुढे चालला होता.''[१] वडगांव येथे प्राचार्य एम. आर. देसाई हे एक इंग्रजी हायस्कूल यशस्वीपणे चालवित होते. पन्हाळ्यालाही एक हायस्कूल चालू होते. येथे बाबूसाहेब गुळवणी मुख्याध्यापक होते. परंतु वाठार फाट्यपासून पन्हाळ्यापर्यंत पसरलेल्या मलकापूरकडे जाणाऱ्या वाटेवर ३० कि. मी. परिसरात इंग्रजी शाळा नव्हती. ती कोडोली या ठिकाणी काढावी असे तात्यांना वाटत होते.

१९४० चा कालखंड म्हणजे शैक्षणिक कार्याच्या अनुकरणाचा कालखंड होता. राजर्षि शाहू महाराजांनी विविध प्रकारची विद्यानिकेतने, शिष्यवृत्त्या व वसतिगृहे स्थापून कोल्हापूरला प्रति काशीनगरीचे रूप देण्यासाठी केलेला प्रचंड प्रयत्न, महर्षी कर्व्यांनी स्त्रीशिक्षणासाठी उघडलेली मुक्तद्वारे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी धगधगीत केलेली समाजशिक्षणाची मशाल आणि वारणा पंचक्रोशीतील खुद्द ऐतवडे गावचे कमवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाला शिक्षण मिळावं म्हणून महाराष्ट्रभर प्राथमिक शाळा, विद्यालये व कॉलेजीस स्थापन करून बहुजन समाजाला शिक्षणाची कवाडं खुली करून दिली. ज्ञानगंगा खेड्यापाड्यांत नेऊन पोहोचवली. असे असताना कोडोलीतील विद्यार्थ्यांची मोठी अडचण होत होती म्हणून तात्यासाहेब कोरे यांनी आपल्या मनातील विचार आपल्या सहकाऱ्यांना बोलून दाखविला. त्यांच्या मित्रांनी तो विचार तात्यांना करून दिला नाही. मित्रांनी तात्यांना असा सल्ला दिला की तुम्ही जर शाळा काढली तर मुले कोण पाठवणार? गरज असतील तरच मागेच शाळा काढली असती. लोकांना शिक्षणाची आवड नाही. शिक्षणाचे महत्त्व कळत नाही. त्यामुळे कशाला उपद्व्याप करायचे असे म्हणून लागले तेव्हा तात्यासाहेब शांत राहिले नाहीत. पण हाती घेतलेल्या कामापेक्षा दुसराच एक महत्त्वाचा प्रश्न होता तो म्हणजे १९४२ ची चलेजाव चळवळ, तात्या ह्या चळवळीत सहभागी झाले. मोठे आंदोलन उभारले. तात्यांचा डागमळा हा तर स्वातंत्र्यसैनिकांचा अड्डाच बनला, त्यामुळे तात्यांच्या मनात

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

असून सुद्धा शैक्षणिक कार्याकडे लक्ष देऊ शकले नव्हते. तेव्हा देश स्वतंत्र करणे हाच एकमेव विचार होता. १९४३ मध्ये तात्यासाहेब आजारी पडले, इतके की तात्यासाहेब संपले अशी परिस्थिती होती. अनेक तज्ञ डॉक्टरांनी उपचार करून कसेबसे ह्या मृत्यूच्या दाडेतून बाहेर पडले. केवळ नशीबाचाच भाग म्हणून ते बरे झाले. कित्येक दिवस ते बेशुद्ध अवस्थेत होते.

तात्या आजारपणातून बरे झाले १९४४ साल उजाडले होते. सांगलीत शाळा शिकत असताना के. डी. पाटील हे त्यांचे वर्गमित्र होते. राजकारणातील समर्थ नि कलंदर नेते म्हणून त्यांनी त्यावेळच्या दक्षिण साताऱ्यातला वाळवा तालुका पादाक्रांत केला होता. डागमळ्यावर त्यांची भूमिगत काळात नेहमी छावणी असे. शिक्षणाशिवाय क्रांतीची पावले भराभरा उचलत नाहीत असे ते नेहमी सांगत. त्यामुळेच त्यांच्याच बरोबर बसून कोडोलीतील इंग्रजी शाळेचा आराखडा तयार केला. आराखडा तयार केल्यानंतर तात्यासाहेबांच्या डागमळ्यात सविस्तर चर्चा आयोजीत केली. तात्यासाहेब यांनी आपल्या मनातील इंग्रजी शाळा चालू करण्यासाठी तपशील सर्वांसमोर मांडला. या चर्चेमध्ये एम. आर. देसाई, के. डी. पाटील, बाबूसाहेब गुळवणी आणि कोडोलीमधील सहकारी मित्रमंडळी सहभागी झाली. या बैठकीमध्ये चर्चेतून शिक्षण क्षेत्रातील यशापयशाचे रहस्य आणि धार्मिक व्यवस्था यांची सांगड घालण्याचा निर्णय झाला. याशिवाय सामाजिक घटकांनी सहभागी व्हावे अशी अपेक्षा तात्यांनी धरली. त्यांचा शिक्षण ही एक सामाजिक गुंतवणूक आहे हा विचार स्पष्ट होता. तसेच तात्यासाहेब कोरे यांच्या ठरावामध्ये त्यांच्या सहकारी मित्रांनी कोडोली सारख्या गांवी इंग्रजी शाळा वसतिगृहात्मक असावी असा ठराव सहमत करण्यात आला. शिक्षणाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी यातील शिक्षक, त्यांचे नियमित वेतन, प्रशस्त वर्ग, शैक्षणिक साधनाची विपुलता, सुसज्ज ग्रंथालय आणि विद्यार्थी इत्यादी बाबतीत चर्चा झाली.

तात्यासाहेब कोरे यांना कोल्हापूर येथील शिक्षण प्रसारक संस्थेचे आधारस्तंभ बॅ. खर्डेकर आणि एम. आर. देसाई यांनी कोडोली हायस्कूलला मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे या कार्यास गती मिळाली. याशिवाय कोडोली गांव परिसरातील गावांची सहमती व सहकार्य संपादन करण्याच्या कार्याला तात्यासाहेब यांनी सुरूवात केली. प्रारंभी आर्थिक पाया मजबूत करावयाचा व त्यानंतर कोडोली विभाग शिक्षण संघ संस्था स्थापन करण्याचा तात्यासाहेब यांच्या मनातील विचार वास्तवात आला. या संस्थेच्या नियंत्रणाखाली जून १९४६ पर्यंत विद्यालय सुरू व्हावे असा संकल्प होता. तात्यासाहेब यांच्या नेतृत्वाखाली प्रथम ५० रू. ची देणगी द्यावी असे कोडोली परिसरातील मंडळींना आवाहन केले. या आवाहनाला जवळ जवळ पन्नास-साठ व्यक्तींचा पाठींबा मिळाला. तसेच इतरही लोकांनी सहकार्याचा हात पुढे केला. तेव्हा २८०० रूपये रक्कम जमा केली. प्रथम ही नवीन संस्था रजिस्टर करण्यात आली.

कोडोली गावात हायस्कूल व वसतिगृहाची व्यवस्था अशी इंग्रजी शिक्षणाची सोय झाली आहे. अशी प्रचार फेरी काढण्यासाठी तात्यासाहेब कोरे यांनी नेतृत्त्व स्वीकारण्याचा सहकारी मित्रांनी आग्रह धरला. तात्यासाहेब यांचे नेतृत्व व कार्य धाडसी प्रवृत्तीचे होते त्यामुळे या शैक्षणिक संस्थेला आर्थिक मदत देणगीच्या स्वरूपात गोळा करण्याचेही ठरले. त्याप्रमाणे आपल्या कार्याला काही मित्रांच्या सहकार्याने प्रारंभ केला. हा प्रचार दौरा बहिरेवाडी, जाखले, पोखले, केकले, माले, शहापूर, सातवे, बोरपाडळे या गावातून काढला. संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा कोडोलीतील गावकामगार पाटील आणि नामवंत कार्यवर्ते श्री. य. श. पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली होती. या दौऱ्यातून तात्यासाहेब कोरे आणि सहकारी मित्रांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कोणतेही ध्येय वास्तवाचे दर्शन घेतल्याशिवाय रास्त होत नसतात. याचा अनुभव या दौऱ्यातून आला. तात्यासाहेब कोरे यांनी विद्यार्थी व पालकांना विश्वासात घेतले.

पालकांच्या समोर जे प्रश्न निर्माण झाले होते. ते त्यांना समजावून सांगितले. परगावच्या मुलांची देखभाल कोण करणार ? तेव्हा तात्यासाहेब यांनी कोडोली पंचक्रोशीतील गरीब पालकांना अभिवचन दिले. यासाठी तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली विद्यार्थी सहाय्य निधी उभारला. तेव्हा पालकांनी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पाठवावयास ठरविले. ही घटना १९४५ सालची होती. त्याकाळी ह्या गोष्टी सोप्या नव्हत्या. त्या सोप्या करण्याचे कार्य तात्यासाहेब यांच्या नेतृत्त्वाने केले.

तात्यासाहेब कोरे तेव्हा कोडोलीत नगराध्यक्ष होते. त्यामुळे त्यांनी नगरपालिकेच्या खोल्या वसतिगृहासाठी भाड्याने दिल्या होत्या. तेथे तात्यासाहेब यांनी लावलेला शैक्षणिक क्षेत्रातील ज्ञानवृक्ष पहिले शैक्षणिक कार्य म्हणून पाहिले जाते. तात्यासाहेब कोरे यांनी ही शिक्षण संस्था चालविण्यासाठी व विकसित करण्यासाठी देणगी जमा करण्याच्या कार्याला सुरूवात केली. समाजातील सर्व स्तरातील लोकांकडून त्यांच्या कुवतीप्रमाणे पैसे दिले. ज्याची परिस्थिती पैसे द्यायची नव्हती. त्यांनी आपल्या घरात असणारे गुळाचे रवे, व इतर अन्य स्वरूपातील देणग्या घेतल्या. त्यावेळी तात्यासाहेब यांनी स्वत: ५०० रूपये देणगी दिली. जो देणगीदार जास्त पैसे देईल त्याचे नांव शाळेच्या नवीन बांधालेल्या खोली, सभागृह, प्रयोगशाळा, ग्रंथालय इत्यादीसाठी देण्याची योजना अंमलात आणली. कोडोली गावच्या बाहेर व बहिरेवाडी व माल्याच्या फाट्यावर उघडा माळ होता. जवळ जवळ २० एकर जागा घेण्यात आली. मालकांनीही शैक्षणिक कार्याचे महत्त्व जाणून रू. ७५ एकरी या दराने ही जागा स्वस्तात खरेदी केली.

आता जागा खरेदीचे काम झाले होते. इमारत बांधकामासाठी देणग्या जमा झाल्या होत्या. अशाप्रकारे अवघड कार्य तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाने होऊ लागले. त्यामुळे त्यांचे मित्र व सहकारी कार्यकर्त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. हे कार्य तसेच चालू ठेवले. तात्यासाहेब यांनी शैक्षणिक कार्याला स्वत:बरोबर अनेक कार्यकर्ते

आपल्या दिव्यातून उभे करण्याचा प्रयत्न त्यावेळी केला. कोडोली गावातील अनेक लोकांनी मदत केली. मदतीसाठी योग्य वातावरण निर्माण केले. एका बाजूला देणग्या गोळा करण्याचे काम जोरात चालू होते. देणग्या गोळा करत असताना अनेक चांगले-वाईट अनुभव येत होते. काही श्रीमंत लोक पैसे असूनसुद्धा अशा सार्वजनिक कार्याला मदत करत नव्हती. पण तात्यासाहेब त्यांचे मत परिवर्तन करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत होते. तर दुसऱ्या बाजूला जून १९४६ पासून सुरू झालेली शाळा मिशन हॉस्पिटलची जुनी इमारत व नगरपालिकेच्या भाड्याने घेतलेल्या जागेत शाळा वसतिगृह चालू होते. श्री. के. जी. गायकवाड या मुख्याध्यापकांच्या हाती ही नवीन शाळा होती. इंग्रजी १, २, ३ या इयत्ताबरोबर स्पेशल इंग्रजी वर्ग इयत्ता ४ थी (म्हणजे सध्याची ५ वी ते ८ वी) असे वर्ग उघडण्यात आले. सुरूवातीस ह्या वसतिगृहात तात्यासाहेब कोरे विद्यार्थ्यांच्याबरोबर राहत होते. कारण ह्या विद्यार्थ्यांना आपण आपल्या घरातून बाहेर आलो आहे, परक्या ठिकाणी आहे असे वाटू नये म्हणून तात्या त्यांच्याबरोबर कांही दिवस राहिले वसतिगृहालाही नांव 'जयहिंद वसतिगृह' असे होते. हळूहळू शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. भाड्याने घेतलेली जागा कमी पडू लागली. तेव्हा कसल्याही परिस्थितीत स्वत:च्या जागेत शाळा भरवण्यासाठी तात्या, नारायण गोडबोले, नानासाहेब केकले, रामभाऊ घाडगे इ. मंडळी शाळा चालवण्यासाठी व नवीन शाळा बांधण्यासाठी मदत करीत होते. शिक्षकांचा पगार ५ तारखेच्या आंत देण्याचा नियम होता. तो काटेकोरपणे पाळला जात होता. त्यामुळे चांगले शिक्षक कोडोली हायस्कूलला मिळाले.

हायस्कूल सुरू करून ते चालवण्यासाठी तात्यांनी खुप कष्ट घेतले. या काळात संपूर्ण समाजात कशी परिस्थिती आहे हे त्यांना कळले. शाळा उभी करण्यासाठी खूप कष्ट घेतले. अहोरात्र फिरले, देणग्या गोळा केल्या. हायस्कूलच्या इमारतीचा पायाखुदाई समारंभ दि. २० ऑक्टोबर १९५० ला झाला. त्याच वर्षी २४ ऑक्टोबर

१९५० रोजी कोल्हापूर संस्थानचे मा. छत्रपती शहाजी राजेसाहेब यांच्या हस्ते इमारतीचा कोनशीला बसविण्याचा समारंभ झाला. व नवीन इमारतीमध्ये १९५२ साली कोडोली हायस्कूल सुरू झाले. पण हे हायस्कूल सुरू करण्यासाठी तात्यांना खूप कष्ट पडले होते. मोठ्या जिद्दिने हे काम सुरू करून पूर्ण केले. तात्यासाहेबांचे १९४०-१९५२ पर्यंतचे बरेच कार्य या हायस्कूलसाठीच खर्च पडले होते. पण त्या भागात देणग्या, विद्यार्थी गोळा करण्यासाठी दौरा करण्याची संधी त्यांना मिळाली, त्यामुळे त्यांचे नेतृत्त्वगुण कोडोली परिसराला माहित झाले. सेवा सोसायटी, नगराध्यक्षपद आणि हायस्कूल उभारणी तसेच प्रजापरिषद, १९४२ ची चलेजाव चळवळ, १५ ऑगस्ट १९४७ चा सहभोजनाचा कार्यक्रम अशा कार्यातून तात्यासाहेब कोरे यांचे नेतृत्त्व उठून दिसले. पुढे या कार्याच्या जोरावरच त्यांना सामाजिक कार्याची जाण झाली आणि भावी कार्याला म्हणजे दुसऱ्या टप्प्याला सुरूवात झाली.

**तात्यासाहेब कोरे यांनी शैक्षणिक कार्यातील उभारलेला आधारस्तंभ श्री वारणा विभाग शिक्षण संस्था :-**

१९५२ साली तात्यासाहेब कोरे यांच्या मनात राहून-राहून सारखा विचार येत होता तो असा की, शैक्षणिक क्षेत्रात प्रगती व्हावयाची असेल तर समाजाच्या प्रेरणेतून प्रकल्पांची रचना केली पाहिजे. तेव्हा शैक्षणिक प्रगतीसाठी नवीन संस्थेच्या स्थापनेचे प्रयत्न चालू केले. कारण तात्यासाहेब कोरे हे शैक्षणिक कार्य व नेतृत्त्वाने प्रेरित झाले होते. त्याचबरोबर ऊस तोडणी मजूर, कामगार, शेतकरी, कारखान्यातील अधिकारी इत्यादींच्या मुला-मुलींना शिक्षणाचा लाभ घेता यावा, सर्व ज्ञानी व्हावेत, अज्ञानाचा अंधकार दूर होवून त्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पडावा. कोडोली व कोडोलीच्या पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना घरातील कामधंदा करून राहिलेल्या वेळेत ज्ञानार्जन होण्यासाठी ही संस्था मदत करेल. ''ज्याप्रमाणे कोडोली हायस्कूल शिक्षणाचा श्रीगणेशा

करण्यापूर्वी परिसरातील शैक्षणिक गैरसोयीचा आणि दुरावस्थेचा आढावा घेतला. तीच गोष्ट तात्यासाहेबांनी १९६३ साली प्रथम केली. आता कार्यकर्त्यांची एकसंघ फळी उभी असल्याने शैक्षणिक परिस्थितीची पाहणी द्रुतगतीने आणि ध्येयनिष्ठ योजनेप्रमाणे करणे शक्य झाले.''[४] तात्यासाहेब कोरे यांनी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने कोडोली व कोडोलीच्या पंचक्रोशीतील शेतीतील उत्पन्न व आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेतला. तात्यासाहेबांना वारणा खोऱ्याचा सर्वांगीण विकासाचा ध्यास होता. त्यातून माणसाला संधी देऊन त्याचे जीवन समृद्ध करणे हे ध्येय साध्य करायचे होते. त्यासाठी तात्यासाहेब कोरे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने वारणा विभाग शिक्षण मंडळाची स्थापना केली. १९५४ ते १९५९ हा कालखंड म्हणजे तात्यांच्या जीवनात फार महत्त्वाचा होता. कारण आज जे वारणानगर ज्या शक्तीच्या जोरावर उभे आहे. त्या वारणा साखर कारखान्याची उभारणी १९५९ ला पूर्ण झाली. कारखान्याच्या पहिल्या गळित हंगामाची सुरूवात त्यावेळचे मुख्यमंत्री व तात्यांचे जीवलग मित्र मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाली. गळित हंगामाच्या शुभारंभीच तात्यांनी यशवंतराव चव्हाण यांना वारणा परिसरात शैक्षणिक संस्था विशेषत: कॉलेज काढण्याविषयी मनोदय व्यक्त केला.

''यशवंतराव चव्हाण हे दूरदृष्टी नेते असल्यामुळे तात्यांना एक सल्ला दिला की, फार कष्टातून सर्वांच्या मदतीने हा कारखाना उभा केला आहे. कारखाना उभा करण्याचे हे अवघड काम पूर्ण झाले याचा अर्थ सर्व यशस्वी झाले असे नव्हे. तेव्हा कॉलेजची या परिसराला गरज आहेच, पण पहिल्यांदा हा साखर कारखाना यशस्वी करा. हे समाजाच मोठं काम आहे.''[५] कॉलेजचे काम आता नको असा चव्हाणसाहेबांनी तात्यांना सल्ला दिला. त्यामुळे १९५९ साली कॉलेज काढण्याविषयीचा विचार बदलून फक्त कारखाना यशस्वी करण्याकडे तात्यासाहेब वळले. या कारखान्याने देशात एक आदर्श निर्माण केला.

वारणा विभाग शिक्षण संस्थेच्या आज विविध शाखामध्ये ज्ञानदानाचे कार्य चालू आहे. या संस्थेच्या नियंत्रणाखाली विद्यालय, महाविद्यालय कनिष्ठ-वरिष्ठ वारणा विद्यामंदिर, प्राथमिक, माध्यमिक, अभियांत्रिकी, औद्योगिक प्रशिक्षण व सैनिकी शाळा अशा विविध शाखामधून वारणा विभाग शिक्षण मंडळाचा विकास झालेला पहावयास मिळतो. तेव्हा या विविध शैक्षणिक शाखांचे कार्य, विकास तात्यासाहेब कोरे होते तोपर्यंत उत्तम चालू होते. आज त्याचे वारस मा. आमदार विनय कोरे यांच्या नेतृत्वाखाली उत्तम चालू आहे. त्यांना साथ देण्यासाठी वारणा विभाग शिक्षण मंडळाचे संचालक तसेच वारणा विविध उद्योगाचे पदाधिकारी काम करत आहेत. शिक्षण संचालक तसेच वारणा विविध उद्योगाचे पदाधिकारी काम करत आहेत. शिक्षण मंडळाच्या शाखेत शिक्षण घेणारा विद्यार्थी सुसंस्कारित व स्वावलंबी व्हावा म्हणून हरप्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. येथून शिक्षण घेऊन पडणारा प्रत्येक विद्यार्थी हा देशाचा आदर्श नागरिक बनला पाहिजे. नोकरीसाठी त्याला इतरांच्या सहाय्याची जरूरी भासता कामा नये. स्वत:च्या पायावर तो जिद्दिने उभा राहिला पाहिजे. किंबहुना इथला विद्यार्थी नोकरी मागणारा असता कामा नये. तो दुसऱ्यास नोकरी देऊ शकणारा निर्माण झाला पाहिजे. एवढा आत्मविश्वास त्याच्यामध्ये व्हायला हवा अशी अपेक्षा तात्यासाहेबांची होती. त्यात त्यांना काही प्रमाणात यशही आले होते.

**तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली श्री वारणा महाविद्यालय वारणा नरगरची स्थापना व विकास :-**

वारणेच्या खोऱ्यातील तरूण उच्च शिक्षणापासून उपेक्षित राहू नयेत, त्यांना कामधंदा करून उच्च शिक्षण घेता यावे. यासाठी १९५९ ला महाविद्यालय काढण्याचा तात्यासाहेबांचा विचार होता. परंतु यशवंतराव चव्हाण यांनी प्रथम कारखाना यशस्वी करा असा सल्ला दिला, म्हणून त्यांनी कारखाना सुरू झाल्यानंतर पहिली पाच

वर्षे कारखान्याकडे लक्ष दिले. त्यानंतर वारणा विभाग शिक्षण संस्था स्थापन केली व या संस्थेचे श्री वारणा महाविद्यालय वारणानगर हे महाविद्यालय स्थापन करून वारणा परिसरातील उच्च शिक्षणाची सोय वारणा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने केली. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीचे जीवन समृद्ध, सुखी आणि यशस्वी करणे हे असते. हे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी गुणवत्ताधारक, चारित्र्यवान, कार्यक्षम माणसे या कामी उपयोगी पडली. तात्यासाहेब कोरे यांची जी धडपड होती तिला वास्तव रूप देण्यासाठी २० जून १९६४ रोजी प्राचार्य भा. रा. भणगे यांच्या हसते शारदापूजन होऊन श्री वारणा महाविद्यालय सुरू झाले, कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांचा अभ्यासक्रम येथे याच वर्षापासून सुरू झाला. महाविद्यालयाची स्थापना झाली त्यावेळी १२८ विद्यार्थी व १२ प्राध्यापक होते. अशा रितीने तात्यासाहेब यांच्या नेतृत्त्वाने महाविद्यालयाची स्थापना होऊन हळूहळू विकास होत होता. श्री वारणा महाविद्यालय वारणानगर यांच्या विकासाचा आढावा घेताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ ही महत्त्वाची बाब आहे. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येत वाढ ही उल्लेखनीय बाब आहे. या महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येत दिवसेंदिवस वाढ होते. एका बाजूला विद्यार्थी संख्या वाढते आहे तर दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांचा दर्जाही वाढत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत वारणा महाविद्यालयाची मुले चमकू लागली आहेत. तसेच क्रीडा क्षेत्रातही अनेक विद्यार्थ्यांनी आपले नांव कमवले आहे. आज २००० इतके विद्यार्थी आहेत व ९५ प्राध्यापक आहेत.

वारणा विविध उद्योग व शिक्षण संस्थामध्ये सुरूवातीच्या काळापासून सर्व संचालक मंडळ, हितचिंतक , मार्गदर्शक यांनी असा पायंडा पाडला की ह्या संकुलात कोणत्याही व्यक्तीच्या नावाने संस्था उभारावयाची नाही. तो पायंडा पुढे बराच काळ

पाळला होता. परंतु तात्यांच्या विचारावर काही महान व्यक्तींचा प्रभाव होता. त्यामुळे पुढील काळात काही व्यक्तींच्या नावाने संस्था उभ्या राहिलेल्या दिसतात. उदा. जय जवान जय किसान हा नारा पसरवणारे भारताचे माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या नावाने वारणानगर येथे सभागृह बांधले गेले. तसेच वारणा विविध उद्योगाला व शिक्षण संस्थेला अडचणींच्या काळात मदत करणारे ज्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हटले जाते तसेच संपूर्ण महाराष्ट्राला आणि वारणा परिसरातील सर्व सुजाण नागरिकांना आवडते म्हणून सर्वांच्या संमतीने श्री वारणा महाविद्यालयाचे नांव बदलून 'यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर' असे ठेवण्यात आले. तात्यांना यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल फार मोठा आदर होता. तसेच महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण यांच्या शब्दाला किंमत होती. वारणा परिसरातील प्रत्येक उद्योग हा यशवंतराव चव्हाण यांच्या कमी-जास्त प्रमाणात प्रयत्नांमुळेच यशस्वी झाला होता. म्हणूनच त्यांचे नाव महाविद्यालयास देण्यात आले. शासकीय पातळीवर प्रत्येक अडचण त्यांनी स्वतः जातीने लक्ष घालून सोडवली म्हणून हा वारणेचा पसारा उभा राहिला आहे.

हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठातील एक आदर्श महाविद्यालय आहे. ग्रामीण भागात असूनसुद्धा शहरी वातावरणात मिळणाऱ्या सर्व सुविधा येथे मिळतात. ग्रामीण भागात असूनसुद्धा चांगले महाविद्यालय दाखविण्यासाठी ह्या महाविद्यालयाची निवड करतात. "१९७३ साली अखिल भारतीय विद्यापीठ कुलगुरूंच्या कोल्हापूर येथील बैठकीच्या प्रसंगी सर्व कुलगुरूंना महाराष्ट्रातील एक उत्तम महाविद्यालय म्हणून श्री. वारणा महाविद्यालय दाखविण्यात आले."[१] तसेच परदेशी पाहुण्यांनाही विद्यापीठातील आदर्श महाविद्यालय म्हणून दाखविण्यात येते. असे असले तरी हे महाविद्यालय एवढे आदर्श, सर्व सोईंनियुक्त बनले ते वारणा परिसरातील सर्व शेतकरी, सभासद इत्यादींच्या त्यागातून. १९६७-६८ च्या कारखाना गळित हंगामामध्ये

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२१० रूपये टन असा विक्री ऊस दर दिला. हा भारतात नवा उच्चांकच होता. जवळपासच्या कारखान्यांच्या तुलनेत ऐंशी रूपये एवढा वाढीव दर होता. तात्यांनी शेतकरी सभासद बंधूना म्हटले "आपल्या भागातील उच्च शिक्षणाच्या सोयीमुळे अखेर लाभ होणार तो आपल्याच परिसरातील, तुमच्याच मुलाबाळांना. शहरात मुलांना पाठवल्यामुळे खर्च वाढतो. तो खर्चाचा भार तुम्हालाच उचलावा लागतो. कारखान्याने ऊस गाळपात देशात विक्रम केला आहे. तुमच्या श्रमातून परिसर कल्याण साधावे यासाठी सभासदाने टनामागे ५ रूपये शिक्षण फंडासाठी देणगी द्यावी. जे सभासद नाहीत त्यांना टनामागे रू. ८० अधिक मिळणार आहेत. त्यांनी टनामागे ८ रूपये दान करावे इतरत्र ऊस घातला असतात तर, आता मिळणारे रू. २१० अवघ्या रूपये १२०-१२५ वर येवून ठेवला असता."[७] अशाप्रकारे शिक्षण मंडळासाठी दान निधी उभा झाला. प्रत्येक सभासदाकडून बिनपरतीच्या ठेवी घेऊन हा शिक्षण निधी गोळा करण्यात आल. अशाप्रकारे त्या ५-७ वर्षात त्याकाळी ४० लाख रूपये जमा केले. त्यातूनच महाविद्यालयाची प्रशस्त वासतू उभी राहिली. त्याचबरोबर सुसज्ज प्रयोगशाळा विस्तृत मैदाने, बॉटनिकल गार्डन, उत्तम ग्रंथालये, प्राध्यापकांची निवासस्थाने, विद्यार्थी वसतिगृहे, सावित्री (आक्का) विद्यार्थीनी वसतिगृह आणि मोठी अभ्यासिका या सर्व सुविधांनी वारणानगरचा परिसर बहरला आहे. इतर कॉलेजना एवढ्या सोई निर्माण करण्यास बराच कालावधी लागला असता. पण वारणा कारखान्याच्या आर्थिक ताकदीवर चार-पाच वर्षातच एवढा सर्व व्याप तयार झाला. हा कारखान्याचा आदर्श घेऊन इतर काही सहकारी साखर कारखान्यांनी शैक्षणिक कार्याकडे लक्ष दिले. त्यानंतर कृष्णा, प्रवरा साखर कारखान्यांणी वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करून पुढची पावले उचलली. पण बऱ्याच कारखान्यांणी वारणेचा आदर्श समोर ठेऊन शैक्षणिक कार्य केले. वारणा कॉलेज जे अनेक सुविधा पुरविते त्याचे कारण वारणा कारखाना आर्थिक ताकद हे ह्या महाविद्यालयाच्या मागे आहे. फक्त आर्थिक ताकदच उपयोगी ठरली असे नाही तर

तळमळीचे कार्यकर्तेही लाभले. तात्यांच्या स्वप्नाला साकार करण्यासाठी आपली सर्व दूरदृष्टी व प्रखर बुद्धिमत्ता अहर्निश वेचणारा शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ता ते म्हणजे "डॉ. रा. धो. शिंगटे हे वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य होते. वारणेच्या खोऱ्यातील मातीची पारख ह्या व्यक्तीने शास्त्रीयदृष्ट्या बिनचूक केलेली असल्याने, महाविद्यालयात प्रवेश घेणारा मळकट कपड्याचा, ओबडधोबड वाणीचा अपरिपक्व विचार सरणीचा, रूढी व अंधश्रद्धा, संकुचित हेवेदावे यांचा परिणाम झालेला, अभिरूचीची जाण नसलेला, 'Strike the iron while it is hot' या ध्येयवादाने स्वच्छ, नीटस, प्रगतीचे महत्त्व ओळखणारा, नव्या युगाचा गरजा उमजून त्याचप्रमाणे कसोशीने वागणारा राष्ट्रप्रेमी, बहुश्रुत, हरहुन्नरी, माणूस व्हावा अशी धडपड नेटाने करीत आहेत."[८]

आज जे वारणा महाविद्यालयाचे नाव झाले आहे. त्यात प्राचार्य शिंगटे यांचे योगदान फार मोठे आहे. ग्रामीण भागातील वारणा महाविद्यालयाने अनेक नामवंत प्राध्यापक घेतले आहेत. शहरी भागातील कॉलेज मुळातच चांगले विद्यार्थी घेतात. चांगले याचा अर्थ असा की ज्यांच्या कुटुंबात शैक्षणिक वातावरण आहे अशा विद्यापीठामध्ये अभ्यासाची आवड लहानपणापासूनच झालेली असते. त्यांचे ज्ञान चांगल्या प्रकारचे असते अशा विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश दिल्यावर कॉलेजचे निकाल चांगले लागणारच. पण ग्रामीण शेतकरी, कामगार कुटुंबातून आलेला विद्यार्थी बौद्धीकदृष्ट्या कमी नसतो. पण त्याच्या घरात शैक्षणिक वातावरण नसल्यामुळे त्याला अभ्यासाची आवड निर्माण होण्यासाठी ज्ञान मिळण्यासाठी नामवंत प्राध्यापक असणे गरजेचे आहे. म्हणूनच प्राचार्य शिंगटे म्हणतात. खेड्यातल्या मुलांना कसलाही प्राध्यापक चालेल ही कल्पना चुकीची आहे. या गोष्टीचा मनापासून आग्रह धरणारी एक संस्था मला भेटली ती म्हणजे श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, हवी ती किंमत देऊन चांगली माणसे गोळा करत हा या संस्थेचा ध्यास पाहून तिच्या द्रष्टेपणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

अप्रगत वातावरण, अशिक्षित पालक, अपरिपक्व विचार यांची पोकळी भरून काढण्याकरिता या दोन्ही गोष्टी साध्य करायला महाकठीण. पण या दोन्ही गोष्टी साधल्यामुळे उजाड माळावर चालू असलेले श्री वारणा महाविद्यालय विद्यार्थ्यांचे आकर्षण-स्थान व पालकांचे श्रद्धा-ठिकाण बनले आहे.''[१]

वारणा महाविद्यालयाने नामवंत प्राध्यापक घेऊन आपला शैक्षणिक दर्जा वाढवलेला आहे. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास, कार्यक्षमता, समाजाभिमुखता आणि राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे अशा प्रकारचे वातावरण निर्माण केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे महाविद्यालयाने आपले ध्येय साध्य करण्याकडे लक्ष दिले आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबर त्यांचे संस्कारशीर व्यक्तिमत्व विकासाकडे लक्ष दिले आहे. महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रमात जिमखाना, एन. सी. सी., एन. एस. एस., प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग इ. चा समावेश करून महाविद्यालयाची यशोगाथा विकास परंपरेत भर घातली आहे. महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रमात महाविद्यालयाने सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमावर परंपरा जपली आहे. तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमावर जास्त भर दिलेला दिसतो. या महाविद्यालयाने मल्लखांब, एन. सी. सी. तर्फे नवी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचालनासाठी अनेक उमेदवारांची निवड झाली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक संचालनासाठी अनेक उमेदवारांची निवड झाली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक श्रमसंसकार शिबीरात ग्रामसर्वेक्षणादी कामांवर देण्यात आलेला पुरस्कार, प्रौढ शिक्षण योजनेमार्फत क्षेत्रीय विकासासाठीच विविध प्रकल्प इ. सर्व योजनांमध्ये महाविद्यालयाने मोठा विकास केला आहे.

महाविद्यालयातील निकाल हा दर्जेदार आहे. सुरवातीच्या काळापासून शिवाजी विद्यापीठातील गुणवत्ता यादीत वारणा महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी चमकू

लागले. महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचाही निकाल वरच्या क्रमांकाचा असतो. आपल्या अभ्यासासाठी काही आकडेवारी समजून येते "सन १९९८-९९ वर्षाचा १२ वी आर्टस् विभागाचा ६८.३३%, कॉमर्स विभागाचा ६६.६६% व सायन्स विभागाचा ६९.५८% निकाल लागला आहे. तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील शाखांचा अंतिम वर्षाचा आर्टस् ८०.४३%, कॉमर्स ८७.४९% व सायन्स १००% निकाल लागलेला आहे."[१०]

आज सध्याच्या नवसहस्त्रकातील हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील एक दर्जेदार व सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. तात्यासाहेब कोरे यांच्या पश्चात विकासाचा वारसा मा. आमदार विनयरावजी कोरे (सावकर) यांनी चालविला आहे. या महाविद्यालयाचे मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. एन. के. पाटील कार्य करीत आहेत. तसेच महाविद्यालयाच्या लौकिकात मोलाची भर घालणारे गुणवंत व यशवंत प्राध्यापक आहेत. श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगरचे गव्हर्निंक कौन्सिलही कार्यरत आहेत. महाविद्यालयाचा शिक्षक वर्ग संख्या ९५ आणि कार्यालयीन सेवक वर्क संख्या ४० आहे. अशा रितीने हे महाविद्यालय विकसनशील आहे. तात्यासाहेब कोरे यांनी लावलेला ज्ञानवृक्ष आजच्या स्थितीला चांगलाच बहरला आहे. तात्यासाहेब कोरे यांचे विचार व आचार कृतीत उतरविण्याचा सर्व वारणा परिसरातील नेते, कार्यकर्ते, शिक्षक, कर्मचारी इ. कार्यरत आहेत. तात्यासाहेब यांच्या नेतृत्वातील दूरदृष्टी येथे वास्तवात वारणानगरला अनुभवायास मिळते.

**श्री वारणा विद्यामंदिराची स्थापना व यशस्वी वाटचाल :-**

तात्यासाहेब कोरे यांनी शिक्षणाची ग्रामीण भागात सोय करीत असताना वरिष्ठ पातळीवरून पूर्व प्राथमिक-माध्यमिक असा उतरता क्रम लावून ज्ञानमंदिराची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

उभारणी केली. याच्या उभारणीसाठी तात्यासाहेब कोरे यांना वारणा कारखान्याचे सर्वात मोठे आर्थिक पाठबळ लाभले. तसेच श्री वारणा विभाग शिक्षण संस्थेच्या सहकार्याने १९६६ साली शिशु विहार ही पूर्व प्राथमिक व श्री वारणा विद्यामंदिर ही प्राथमिक शिक्षण देणारी जोडसंस्था तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली. त्यावेळी या संस्थेत सुरवातीला ४ वर्ग व १५० मुले होती. नंतर ती संस्था वर्गसंख्या वाढल्यामुळे विद्यार्थ्यांची ही संख्या वाढली. या संस्थेतील विद्यार्थी प्रामाणिक, हुशार, कुशल, व चांगले संस्कार असणारा अशा स्वरूपाचा आहे. या विद्यामंदिराच्या स्थापनेपासून आजपर्यंत शिष्यवृत्ती परिक्षेत विद्यार्थी उत्तीर्ण होऊन अनेक शिष्यवृत्त्या मिळवितात. या शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. श्री वारणा विद्यामंदिर या संस्थेत परीक्षांचे निकाल ९५ ते १००% लागतात. या विद्यामंदिरात शासनाच्या धोरणाप्रमाणे ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेस जोडले.

श्री वारणा विद्यामंदिर मध्ये अभ्यासक्रमाबरोबर शारिरीक शिक्षण, लेझीम, कवायत, डंबेल्स, निशाण, टिपरी इ. तसेच कलापथम, अभंग, ओव्या, पोवाडे, भारूडे व सामूहिक नृत्ये इ. सर्व वाङमयीन व कला प्रकार यांचीही सांस्कृतिक विकासासाठी भर दिली जाते. विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेतल्या जातात. स्पर्धेत नंबर येणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून प्रोत्साहन दिले जाते. शाळेच्या काम वाखाणताना अनेक विलक्षण तज्ञी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. या विद्यामंदिराच्या यशस्वी वाटचालीसाठी येथील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, कर्मचारी हे सतत कार्यरत आहेत. या विद्यामंदिरामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी ग्रंथालये, विद्यार्थ्यांसाठी बुक बँकेची सोय आणि निसर्गरम्य परिसर यामुळे या विद्यामंदिराच्या वाटचालीत महत्त्वाचा भाग आहे. ''आज श्री वारणा विद्यामंदिरामध्ये ६२२ विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून त्यापैकी २३५ मुले आहेत. बालवाडीतील

विद्यार्थ्यांची संख्या २९१ इतकी आहे. वारणा विद्यामंदिराला जोडूनच इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे. लहान वयातच शिस्त लावली. तर मुले पुढे यशस्वी होतात व त्यांची प्रगती होते या तत्त्वावर वारणा विद्यामंदिरामध्ये शिक्षण दिले जाते."[११] या विद्यामंदिरात स्वच्छतेचे महत्त्व अतिशय चांगले आरोगयासाठी विचार केला आहे. तसेच या विद्यामंदिरात गायन, वाद्य, नाटक, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेतल्या जातात. त्यामुळे वारणा विद्यामंदिराने आपला स्वत:चा असा एक वेगळा ठसा उमठविला आहे. तसेच यशस्वीतेकडे वाटचाल चालू आहे.

**तात्यासाहेब कोरे यांनी स्थापन केलेले सामाजिक जबाबदारीचे श्री. वारणा विद्यालय, वारणानगर :-**

तात्यासाहेब कोरे यांचे शैक्षणिक कार्य यशस्वीपणे वाटचाल करीत असताना, वारणा खोऱ्यात शिक्षणाच्या सर्व संस्था उपलब्ध केल्या. तात्यासाहेब कोरे यांनी महाविद्यालय व प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणासाठी प्रत्येक विद्यार्थी उद्या समाजात जीवन जगताना विश्व नागरिकत्वाचे आणि मानवतेचे संस्कार श्री वारणा विद्यालयातून शिकू शकले. सामाजीक जबाबदारीचे भान त्याला राहिले. अशा स्वरूपाचे स्वप्न तात्यासाहेब कोरे यांनी ग्रामीण नेतृत्वाच्या भूमिकेतून साकार केले.

तात्यासाहेब कोरे यांनी सन १९६९ साली श्री वारणा विद्यालय, वारणानगर माध्यमिक शिक्षण संस्थेची सोय केली व वारणानगर मधील माध्यमिक शिक्षणाची उणीव भरून काढली. या विद्यालयामध्ये स्थापनेच्या दुसऱ्या वर्षी ५२२ विद्यार्थी व १५० विद्यार्थीनींची संख्या होती. वारणा परिसर खेड्यातील विद्यार्थी या विद्यालयामध्ये प्रवेश घेतला. "एका भव्य प्रशस्त आणि सुसज्ज अशा इमारतीत अध्ययनाचे कार्य करतात. संस्थेस तात्यासाहेब कोरे यांचे प्रभावी नेतृत्त्व लाभले आहे. विशाल क्रीडांगण आणि विविध खेळाची आवड निर्माण करतील, असे क्रीडाप्रेमी शिक्षक

आणि साहित्य रेलचेल असल्याने श्री वारणा विद्यालय लोकप्रिय होऊ लागले आहे.''[१२]

हे विद्यालय भारतीय संस्कृतीमधील गुरूकूल पद्धतीने चालविले जाते. विद्यालयातून गुणी, शिस्तबद्ध, स्वावलंबी, सुसंस्कृत असे समाजसेवक नागरिक घडविणे हे ध्येय विद्यालयाने स्वीकारले आहे. वास्तविक त्याचसाठी हे विद्यालय आहे. विद्यालयाच्या विकासामध्ये सामाजिक जबाबदारी म्हणून श्री. वारणा विभाग शिक्षण संस्था कार्यरत आहे. या विद्यालयातील विद्यार्थ्यांची सर्व जबाबदारी या विद्यालयाने घेतली आहे. विद्यार्थ्यांची विद्यालयामधील हजेरी १००% असते. तात्यासाहेब कोरे यांच्या विद्यार्थी जीवनातील त्यांना शासनाने व श्रीधरपंत गुरूजींनी दिलेली शिदोरी त्यांना जशी उपयोगी पडली त्याचप्रमाणे आज शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भावी काळात उपयोगी पडली पाहिजे अशी इच्छा तात्यासाहेब कोरे यांना होती. हे विद्यालय ग्रामीण भागात आहे. त्यामुळे इ. १० वी च्या परिक्षेसाठी वारणानगर हे शालान्त परीक्षेचे केंद्र आहे. या विद्यालयाला अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक केंद्रात पहिला येवून मिळविला आहे. अशा स्वरूपाच्या विद्यालयाची यशस्वी वाटचाल आहे. त्यामुळे श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचा कार्यभाग व्यवस्थित आहे. यावरून तात्यासाहेब कोरे यांचे ग्रामीण भागातील नेतृत्त्व योग्य मानले जाते.

श्री वारणा विद्यालयाची यशस्वी सामाजिक जबाबदारी विचारात घेताना नियोजनपूर्वक अभ्यासक्रम राबविला जातो. याची सर्व जबाबदारी या विद्यालयातील मुख्याध्यापक, साहाय्यक शिक्षक यांच्यावर असते. तसेच संस्था पालक यांच्यावरही जबाबदारी असते. नवीन आव्हाने व नव्याचा शोध घेणारे समाज धुरीणांनी कार्य नियोजन केले पाहिजे. भावी काळात आपणास किती शेतकरी, कीती शेतकी तज्ञ, डॉक्टर्स, वकील, इंजिनिअर्स आणि विविध क्षेत्रातील व्यावसायिक, कुशल कारागिर यांचा अंदाज घेतला पाहिजे. आणि मग तेवढ्या विद्यार्थ्यांना आवश्यक तो शिक्षणक्रम आखून दिला

पाहिज. या सर्व व्यवसायात प्रथम क्रमांकाचे महत्त्व शेती व्यवसायाला आहे. हे विविध उपक्रम हाती घेताना विद्यार्थ्यांची मानसिक तयारी ही महत्त्वाची आहे. हे कार्य पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्यावर अवलंबून आहे. सर्व काही तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली चालू आहे. तात्यासाहेब कोरे यांनी या विद्यालयातील सर्व सेवक वर्ग शासकीय अनुभवाने संपन्न असलेल्या व्यक्तींचा भरला आहे. त्याचा फायदा श्री वारणा विद्यालयाच्या गुणात्मक व दर्जाच्या बाबतीत विकास करण्यासाठी झाला.

"वारणा विद्यालयामध्ये एकूण विद्यार्थी संख्या ८४४ असून त्यापैकी २९५ मुली आहेत. एकूण विद्यार्थ्यांपैकी २०५ मुले आणि ४५ मुली विद्यालय वसतिगृहात राहत आहेत. सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात दहावी परिक्षेचा निकाल १००% लागला आहे. वारणा विद्यालयाने उच्च निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. विद्यालयातील ७ विद्यार्थी विशेष गुणवत्ता श्रेणीत व ४९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. वारणा विद्यालयात गुरूकुल पद्धतीचे वसतिगृह असून हे वसतिगृह एक आदर्श सांस्कृतिक केंद्र म्हणून सर्वांना सुपरिचित आहे. वारणा विद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी नेहमीच बाहेरील व कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांची गर्दी असते."[११] वारणा विद्यालयाला प्राचार्य महाबळेश्वरवाला यासारख्या नामवंत व ध्येयवेड्या शिक्षणतज्ञांच्या कुशल नेतृत्वाखाली या संस्थेने एक आदर्श विद्यालय असा नावलौकिक अखिल महाराष्ट्रात मिळविलेला आहे. उत्तम शिक्षणाबरोबरच शिस्त आणि संस्काराचे धडे याठिकाणी विद्यार्थ्यांस मिळत आहेत. कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता, या विद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी दूरदूरचे विद्यार्थी येतात. अशा स्वरूपाचा विकास श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाने चालू ठेवला आहे. तात्यासाहेबांचे कर्तव्य व नेतृत्त्व या विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेतून वारसा रूपाने दर्शवित होते.

**तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालय, वारणानगर हे तात्यासाहेब यांनी शिक्षण क्षेत्रातील खुले केलेले तंत्रशिक्षणाचे दालन :-**

ज्या पद्धतीने वारणा महाविद्यालयाची स्थापना करून वारणा परिसरातील मुलांना उच्च शिक्षणाची सोय झाली होती. त्याचप्रमाणे १९८३-८४ पासून वारणाकाठी तंत्रशिक्षण-पर्वही निर्मिले. कारण या काळात सतत जाणवत होते की, आपल्या देशात, शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची संख्या जास्त आहे. सर्वच लोकांना, सरकार रोजगार उपलब्ध करून देऊ शकेल असेही नाही. तेव्हा बेकारीच्या समस्येचा विचार करताना, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांनी आपापल्या गावातच स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करून स्वावलंबी बनावे. ज्यामुळे खेड्याकडून शहराकडे जाणाऱ्या युवकांचा लोंढा थांबू शकेल. आणि लोकसंख्या वाढीने निर्माण झालेल्या प्रश्नाची काही प्रमाणात का होईना, तीव्रता कमी होऊ शकेल. यासाठी वारणाकाठी प्रथम मुलामुलींना तंत्रशिक्षण देण्यासाठी तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी हे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतनही निर्मिले. ही प्रारंभपासून कळसापर्यंत अशी, तंत्रशिक्षणाची सोय केली. वारणा सहकारी साखर कारखाना आणि तात्यासाहेब कोरे यांच्या आर्थिक आणि बौद्धीक क्षमतेमुळे हे तंत्रशिक्षण वारणाकाठच्या लोकांना मिळू लागले. याच काळात महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने उच्चतंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण अशा संस्था विना-अनुदान तत्त्वावर उभ्या राहिल्या. प्रवरानगर मध्ये तंत्र सर्वप्रकारचे शिक्षण उपलब्ध करून दिले होते. तात्यांनी अशा ठिकाणी जाऊन संपूर्ण पाहणी केली. याचा सखोल अभ्यास करून वारणा परिसरात कोणत्या शिक्षणाची जास्त गरज आहे हे ओळखून तंत्रशिक्षणाची सोय केली.

प्रथम आय. टी. आय. ची सुरूवात ५ ऑगस्ट १९८३ ला केली. शासनाकडून ही परवानगी विनाअनुदान तत्त्वावर आय. टी. आय. सुरू करायला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मिळाली. त्यामुळे प्राथमिक स्वरूपाच्या तंत्रज्ञानाची सोय झाली. या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणारे बहुतांशी विद्यार्थी हे कारखाना कार्यक्षेत्रातील होते आणि आजही आहेत. पहिल्या वर्षी आय. टी. आय. साठी शीटमेटल वर्क, इलेक्ट्रीशियन, मेकॅनिकल, ड्राफ्टस्मन, सिव्हिल ड्राफ्टस्मन असे चार ट्रेड सुरू करण्यात आले. दुसऱ्या वर्षापासून फिटर आणि वेल्डर हे आणखी दोन व्यवसाय सुरू करण्यात आले. त्याचप्रमाणे इलेक्ट्रीशियन व्यवसायाची आणखी एक बॅच सुरू करण्यात आली. तंत्रशिक्षण हे केवळ मुलांच्यासाठीच आहे असे नव्हे. तर मुलींच्याही कलागुणांना वाव मिळावा म्हणून तात्यासाहेबांनी महिलांसाठी टेलरिंग व कटींग आणि एम्ब्रॉयडरी फॅन्सी वर्क, हे सर्टीफिकेट कोर्सेसही सुरू करण्यात आले. त्यामुळे महिलांनाही लघू उद्योग करता येऊ लागले. आय. टी. आय. मध्ये शिक्षण घेणारे ९०% विद्यार्थी हे कारखाना कार्यक्षेत्रातील असल्यामुळे प्रत्येक गावा-गावामध्ये आय. टी. आय. प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी तयार झाले. सुरूवातीच्या काळात एखाद-दुसरा विद्यार्थी गावामध्ये होता. पण प्रत्येक वर्षाला त्यामध्ये काही नवीन प्रशिक्षण घेतलेल्यांची वाढ होऊ लागली. त्यामुळे प्रत्येकाला काम मिळेलच असे नाही. म्हणून आय. टी. आय. मधून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याने इतरत्र नोकरीच्या शोधात न फिरता, त्याने स्वत:चा लघू उद्योग सुरू करून स्वावलंबी बनावे. त्यामुळे लघु उद्योगात भर पडेल. त्यापासून इतरही काही शिक्षण घेऊन तयार होतील. लहान-लहान उद्योग वारणा परिसरात उभे राहतील आणि भागाचा कृषिबरोबरच औद्योगिकही विकास होईल असे तात्यासाहेबांचे मत होते.

### तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटरची स्थापना आणि विकास :-

दर वर्षाला अनेक पदव्या घेऊन विद्यार्थी बाहेर पडत असतात. त्यातील सर्वांनाच नोकरी मिळू शकत नाही. सर्व लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. पण दुसऱ्या वर्षाला अशा विद्यार्थ्यांच्या संख्येत भर पडते. त्यामुळे सुशिक्षित तरूणाची बेकारी

वाढते. अशा बेकार तरूणांना काही तर काम उपलब्ध व्हावे यासाठी तात्यासाहेब कोरे यांनी वरील संस्था स्थापन केली. ही संस्था स्थापन करण्यामागचे एकमेव कारण म्हणजे वारणा परिसरातील तरूण इतरत्र नोकरीसाठी फिरू नये. म्हणून १५ ऑगट १९८४ पासून ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेमुळे अनेक लोकांना काम मिळाले आहे.

तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर मध्ये सर्व प्रकारचे लोखंडी फर्निचर तयार करण्यात येते. या फर्निचरचा दर्जा उत्तम असून इतर कंपन्यांच्या तुलनेत फर्निचरची किंमत अत्यंत वाजवी, आणि कमी अशी असते. त्यामुळे येथे तयार होणाऱ्या फर्निचरला मोठ्या प्रमाणावर मागणी येते. फर्निचर तयार करणारे सर्व विद्यार्थी आय. टी. आय. मधून शिक्षण घेऊन नुकतेच बाहेर पडलेले आहेत. त्यांना फर्निचर तयार करण्याचा मुख्यत: अनुभव मिळतो आणि कामाचा योग्य मोबदलाही दिला जातो. यातून पुढे ते स्वतंत्रपणे व्यवसायही सुरू केले आहेत.

या सेंटरच्या वतीने कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्यासाठी इलेक्ट्रीक मोटार रिवाईंडींगची, दुरूस्तीची योजना हाती घेण्यात आली. त्यासाठी कार्यक्षेत्रातील इलेक्ट्रीक मोटारीचा सर्व्हे घेण्यात आला आणि प्रॉडक्शन सेंटरने हाती घेतलेल्या योजनेची माहिती, परिपत्रक काढून सर्वांना कळविण्यात आली. त्याचा फायदा कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना वेळेवर आपली मोटर्स दुरूस्त करून मिळू लागली. शेतीचे नुकसान थांबले, तसेच स्टील फर्निचर विभाग सुरू करून खुर्च्या, कपाटे, टेबल्स, ज्युअेल, डेस्कस् बनवण्यास सुरूवात केली त्याची ऑर्डर्स मिळू लागली. ज्या उद्देशाने तात्यांनी हे केंद्र सुरू केले त्याचा उद्देश पूर्ण झाला. आज वारणा परिसरात आय. टी. आय. प्रशिक्षण घेऊन विद्यार्थी इतरत्र नोकरीसाठी न जाता आपल्याच भागात छोटे-छोटे व्यवसाय सुरू करू लागले आहेत.

**तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी :-**

तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी या वारणेच्या दृष्टीने, तंत्रशिक्षण -शिखर संस्थेची स्थापना ५ सप्टेंबर १९८३ ला झाली. मा. नामदार श्री. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्त्वाखालील, महाराष्ट्राच्या पुरोगामी मंत्रिमंडळाने, ग्रामीण भागात तंत्रशिक्षणाची असणारी उणीव भरून काढण्यासाठी, तसेच वारणा परिसरातील हुशार, होतकरू मुलांना उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई यासारख्या ठिकाणी जाऊन शिक्षण घेता येत नसे. कारण महाराष्ट्रातील बहुतेक इंजिनिअरींग कॉलेज हे विनाअनुदान तत्त्वावर चालवली जातात. त्यामुळे अशा कॉलेजीसची शैक्षणिक फी तुलनेने अधिक असल्यामुळे, सामान्य कुटुंबातील मुलांना ते परवडत नाही. तसेच बाहेर राहण्याचा जेवण्याचा मोठा खर्च मोठा असतो. त्यामुळे इच्छा असून सुद्धा वारणाकाठचा विद्यार्थी अशा उच्च तंत्रशिक्षणापासून दूर राहतो. तसेच अनुदान तत्त्वावर जे काही कॉलेज आहेत तेथे शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेने ग्रामीण भागातील मुले कमी पडतात. तेव्हा अशा परिस्थितीत तात्यांनी पूर्ण विचारांती वसंतदादा पाटील तसेच इतर काही शिक्षणतज्ञ यांच्या सल्ल्यानुसार वारणानगर येथे साखर कारखान्याच्या मदतीने विनाअनुदान तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतन सुरू करण्यास परवानगी दिली. हे कॉलेज स्थापन करण्यामागची तात्यांची प्रेरणासुद्धा कारखाना क्षेत्रातील सर्व होतकरू तरूणांना तंत्रशिक्षणाची संधी मिळावी हीच होती.

प्रारंभी या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पदवीसाठी केमिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, कन्स्ट्रक्शन हे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. या अभ्यासक्रमासाठी इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन, इंडस्ट्रियल मॅनेजमेंट, डेअरी डेव्हलपमेंट आणि पेपर टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी पहिल्या वर्षी एकूण १९० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. एकविसाव्या शतकाला सामोरे जाण्यासाठी प्रत्येक पात्र तरूणाला संधी उपलब्ध

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

व्हावी यासाठी कार्यक्षेत्रातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांनं कर्जाऊ शिष्यवृत्त्या दिल्या जातात. "कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांनी संस्थेत प्रवेश घेतला. त्यांच्यासाठी फीमध्ये अत्यंत उपयुक्त आणि अभिनव सवलती देण्यात आल्या. डिप्लोमासाठी प्रवेश असल्यास ७५% हून अधिक क्गुण असल्यास ७५% फी सवलत आणि ७०% हून अधिक गुण असल्यास ५०% फी सवलत तर पदवीसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ८५% हून अधिक गुण असल्यास ५०% फी सवलत देण्यात येते."[१४] अशाप्रकारे फी सवलती ठेवण्यामागचे कारण म्हणजे वारणा परिसरातील शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत. असा तात्यासाहेबांचा दृष्टिकोन होता.

विनाअनुदान तत्त्वावर चाललेले हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठातील एक आदर्श म्हणून त्याचा लौकीक आहे. ज्या पद्धतीने कारखान्याच्या परिसरातील उच्च शिक्षणासाठी सोई करून दिल्या. तसेच इतरही विद्यार्थ्यांना अनेक सोई दिल्या आहेत. अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतनासाठी भव्य अशी इमारत, वर्कशॉप आणि प्रयोगशाळा बांधून पूर्ण केली आहे. परिसरातील तसेच बाहेरील विद्यार्थ्यांना राहण्याची सोय म्हणून अद्ययावत वसतिगृह बांधण्यात आली आहेत. वारणा विभाग शिक्षण संस्था म्हणजे महाराष्ट्रातील एक आदर्श शैक्षणिक संकुलन आहे. हे सर्व कारखान्याच्या आर्थिक मदतीमुळेच शक्य झाले आहे. वारणा सहकारी साखर कारखान्याच्या सभासद बंधूंच्या त्यागातून ही संस्था उभी केली आहे. सभासदांनी सुद्धा कोणतीही तक्रार न करता भागाच्या विकासासाठी तात्यांच्या नेतृत्त्वाखाली शैक्षणिक निधी दिला आहे. हा निधी उभारण्यासाठी तात्यांच्या नेतृत्त्वाची कसब लागली होती. तात्यासाहेब जे काही करतात ते भागाच्या विकासासाठी करतात. त्यामूळे सभासदांनीही स्वखुषीने निधी दिला. त्यामुळेच हे विना अनुदान तत्त्वावरील महाविद्यालय सर्व सोईनियुक्त सज्ज आहे. आज ह्या महाविद्यालयात ११५० इतके विद्यार्थी शिक्षण घेतल

आहेत. इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, कॉम्प्युटर इन्फरमेशन टेक्नॉलॉजी, सिव्हिल हे ग्रॅज्युएटचे कोर्सेस आहेत. सर्व परिक्षांचा निकाल सरासरी ७५% लागतो.

**तात्यासाहेब कोरे यांच्या कलाकृतीतून साकारलेला वारणा बालचमूंचा वाद्यवृंद :-**

वारणेची साखर जशी प्रसिद्ध, वारणेचे दूध आणि श्रीखंड जसे अतीव ग्राहकप्रिय, तशीच वारणा बालवाद्यवृंदाची किर्ती दिवंगत झाली आहे. सर्व भारतभरच नव्हे तर सातासमुद्रापलिकडे ती पोहोचली आहे. वारणा साखर कारखाना त्याच्या आजवरच्या औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याद्दल सर्वत्र प्रसिद्ध होताच. त्याचप्रमाणे त्याच्या बालवाद्यवृंदाने सांस्कृतिक क्षेत्रात अत्युच्च साधना करून, भारतभर आणि जगरभर किर्तीध्वजा फडकाविली. लहान मुलांच्यावर चांगले संस्कार झाले आणि त्यांना ध्येयवेज शिक्षक मिळाला आणि संगीत उपासनेसाठी सुविधा साधने मिळाली की काय चमत्कार घडू शकतो, याचे मुर्तिमंत उदाहरण म्हणजे वारणा बालवाद्यवृंद. संगीतामध्ये अतिनिपुन असणारी ही मुले, शालेय अभ्यासातही वरचे क्रमांक पटकावणारी आहेत. वारणा बालवाद्यवृंदातील अवघ्या चार ते बारा वर्षे वयोगटातील लहान मुले आहेत. ही सर्व मुले वारणानगरमधील, कामगार अधिकारी, प्राध्यापक व विविध स्तरावरील सेवकांची आहेत. या बालकलाकारांच्या वाद्यसंगीताने श्रोत्यांच्या आत्म्याला स्वर मैफलीमध्ये धुंद-फुंद-गुंग करून कधी सोडले हे लाकांना समजत नाही. वाद्यवृंदाची संगीत मैफल संपली तरी तीचा नाद, स्वर अलौकिक कर्णमधून आवाज सतत राहतो. हा वाद्यवृंद बालकलाकारांचा आहे. त्यामुळे व्यापारी तत्त्वावर कोणताही कार्यक्रम होत नाही. म्हणून वाद्यवृंद चालू केल्यापासून आजपर्यंत त्याची ख्याती जवळजवळ भारतभर झाली तसेच परदेशातही झाली आहे. या वाद्यवृंदात हार्मोनियम, वीणा, तबला, सतार, इलेक्ट्रीक गिटार, तार सनई, ढोलकी, तंबोरा, सनई इत्यादी जुनी व नवीन पद्धतीची वाद्येही लहान मुले वाजवतात.

हा वाद्यवृंद यशस्वी होण्याचे कारण म्हणजे तात्यांच्या नेतृत्वात अनेक गुण आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे चांगली माणसे शोधणे. त्यासाठी वाट्टेल तेवढी किंमत देऊन ती वारणेमध्ये आणणे, माणसाची पारख हा तात्यांचा मोठा गुण होता. आणि कोणती व्यक्ती कोणत्या प्रकारचे उत्तम काम करेल यांचाही अंदाज तात्यांना येत होता. वारणा बालकलाकारांचा वाद्यवृंद यशस्वी करण्याची जी किमया त्या मुलांची तर खरीच आहे. पण ह्या साऱ्या जादुगिरीच्या मागे श्री. शंकरराव कुलकर्णी नावाचे संगीत दिग्दर्शक आहेत. म्हणूनच सर्वकाही चांगले झाले आहे. म्हणूनच अनेक संगीत जाणकार म्हणतात की, वारणेच्या प्रत्येक प्रकल्पामागे तात्या आहेत आणि तात्यांच्या मागे शंकरराव कुलकर्णी, नंदकुमार नाईक यांच्यासारखी माणसे आहेत. कार्यकर्त्यांचा परिवार आहे. म्हणून वारणेचे नांव सर्वत्र झाले आहे. ४ ते १२ वर्षातील लहान मुलांना दररोज शंकरराव कुलकर्णी तासन-तास सराव करून घेतात. संगिताबद्दल प्रेम, आकर्षण निर्माण करतात म्हणूनच हा वाद्यवृंद सर्वत्र नावजतो आहे. १९८९ च्या अखेरी मॉरिशसला जाऊन आला. मॉरिशसच्या ऊस लागवडीच्या उद्योगाला साडेतीनशे वर्षांचा इतिहास आहे. त्या त्रिशतकोत्तरी गौरव समारंभात, भारतवर्षाचे, स्नेहशील सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून वारणेची बालके, मॉरिशसला जाऊन आली. ''त्यांच्या संगीत कौशल्याने त्यांच्या गायन वादनाने, नृत्य आणि अभिनाने या वारणा बालवाद्यवृंदावया, जणू गंधर्वयुगीनच, अशाच एकूण गौरवशाली अदाकारीने परदेशस्थ रसिक संतुष्ट झाले. मंत्रमुग्ध होऊन माना डोलविते झाले.''[१५] मॉरिशसमधील वृत्तपत्रे, रेडिओ, टि. व्ही. या प्रसार माध्यमांनी, वारणा बालवाद्यवृंदाच्या कार्यक्रमाला भरपूर प्रसिद्धी दिली. वारणा बालवाद्यवृंदाच्या भेटीचे चिरंतन प्रतीक म्हणून मॉरिशस देशातील मॉटाने गावातील खुल्या नाट्यगृहाला 'वारणा प्लेस' असे नामकरण करण्याचे औचित्यही मॉरिशस सरकारने दाखविले.

सुरवातीच्या काळात फक्त वाद्यवृंद होते पण १९८२ पासून गायन आणि नृत्य हे दोन विभागही सुरू केले. वारणा बालवाद्यवृंदाची किर्ती संपूर्ण देशभर होऊ लागली. त्यानंतर नाट्यविभागही सुरू केला आणि श्री आण्णासाहेब किर्लोस्करांचे 'संगीत सौभद्र' सादर केले. तेही अभूतपूर्व गाजले. मोठमोठ्या संगीतकारांकडून वाहवा मिळविली. जेष्ठ्य आणि श्रेष्ठ साहित्यिक श्री पु. ल. देशपांडे, जितेंद्र अभिषेकी, प्रभाकर पणशीकर, राम कदम, सौ. सुधा करमरकर, सुधीर फडके, सौ. जोत्स्ना भोळे इ. संगीत तज्ञांकडून वाहवा मिळवली. त्याचबरोबर मा. यशवंतरावजी चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, रत्नाप्पाण्णा कुंभार इ. हा वाद्यवृंद म्हणजे एक अभुतपूर्व चमत्कार आणि सर्वांना आदर्श आहे असे म्हटले. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता अशा अनेक वृत्तपत्रांनी वारणेच्या बालकांच्यावर लेख लिहिले आहेत. वारणा परिसराची कीर्ती संपूर्ण देश आणि परदेशातही झाली आहे. वारणा साखर कारखान्याच्या सांस्कृतीक कीर्तीची ही किमया आहे. ह्या वाद्यवृंदातून तात्यासाहेबांची संगीत कलेविषयक असणारी आपुलकी दिसून येते. शंकरराव कुलकर्णी, श्रीराम वालावलकर यासारखी मंडळी वाद्यवृंद यशस्वी करण्याच्या कामी सर्वसंग-परित्याग करून वेडीपिसी झाली म्हणूनच हे शक्य झाले. म्हणूनच अकलूजचे संगीतप्रेमी श्री. शंकरराव मोहिते-पाटील म्हणाले, "तात्यासाहेब तुमच्या वाद्यवृंदाचा जागतिक दौरा करून आणण्याची मला परवानगी द्या, या स्वर्गीय संगीताच्या स्वरलहरीवर मी तुम्हाला कोट्यवधी रूपये मिळवून देतो."[१६]

याशिवाय तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाने ग्रामीण भागात जो विकास झाला. ह्या शैक्षणिक विकासामध्ये व कार्यामध्ये कोणतीही कमतरता भासणार नाही. अशा स्वरूपाची वेगवेगळ्या मार्गाने मार्गदर्शन केंद्र स्थापन केलेले आहेत.

प्रामुख्याने विलास दादा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करून तरून विद्यार्थ्यांना ज्या क्षेत्रामध्ये सेवा करण्याची आवड आहे. त्या स्पर्धा परिक्षेचे

मार्गदर्शन करणारे अध्यापक वर्ग नेमला. तसेच कार्यक्षेत्रातील युवकांमध्ये व्यायाम व शरीर सौष्ठवाची आवड निर्माण व्हावी व कुस्ती कलेची जोपासना करण्याच्या प्रेरणेने श्री. वारणा व्यायाम मंदिराची स्थापना करण्यात आली. व्यायाम मंदिरामध्ये जीम्स व कुस्ती केंद्र असे दोन विभाग कार्यरत आहेत. जिम्स विभागामध्ये दररोज १०० ते १५० विद्यार्थी व्यायामाचा सराव करतात. कुस्ती विभागामध्ये सध्या ७० पैलवान आहेत. दरवर्षीला वजन गटानुसार वारणा परिसरातील ६ पैलवानांची चाचणी निवड करून प्रथम विजेत्यांना मानधन दिले जाते.

श्री शारदा वाचन मंदिर १९७० साली स्थापन केले. कारखान्याच्या छायेत आदर्श, स्वावलंबी, सुसंस्कृत, वैचारिक आणि संयमी व ज्ञानसमृद्ध असा नवा माणूस घडविण्यासाठी तात्यासाहेबांनी शारदा वाचन मंदिर स्थापन केले. सुरूवातीला केवळ १०० पुस्तक संख्येवर हे वाचन मंदिर सुरू केले. सध्या १२००० संख्येची समृद्ध ग्रंथसंपादन असून दैनिके, वाचन विभाग, नियतकालिके व संदर्भ ग्रंथ विभाग, महिलांसाठी स्वतंत्र वाचन कक्ष आहे. दररोज जवळजवळ २०० वाचक या वाचन साहित्याचा आस्वाद घेतात. तसेच दरवर्षीला 'वर्षो व्याख्यानमाला' भरविण्यात येते. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील ख्यातनाम वक्ते या व्याख्यानमालेत भाग घेतात. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या ज्ञानात भर पडते असे समाज उपयोगी कार्य शारदा वाचन मंदिर करत असते.

**समारोप :-**

प्रकरण ४ मध्ये तात्यासाहेब कोरे यांचे शैक्षणिक कार्य व नेतृत्त्वाचा विचार केला आहे. वारणा खोऱ्यातील अज्ञानाचा अंध:कार नष्ट होऊन ज्ञानाच्या ज्योती प्रत्येक नागरिकाच्या मनात पेटाव्यात त्याचा प्रकाश त्या माणसांच्या आचरणातून दिसून यावा. शिक्षणाचा लाभ सर्वांना मिळावा. वारणा खोऱ्यातून एक 'नवीन माणूस' घडण्याचे

ध्येय पूर्ण व्हावे असा दूरदृष्टीकोन ठेऊन तात्यासाहेब कोरे यांनी शैक्षणिक कार्यात नेतृत्त्व केले. त्यांनी कोडोली मध्ये कोडोली हायस्कूल स्थापन केले व शैक्षणिक कार्यातील यशस्वी प्रयोग झाला. त्यानंतर कारखाना उभारणीकडे पूर्ण लक्ष दिले व १९६४ साली वारणा विभाग शिक्षण संस्था स्थापली व संस्थेच्या आधारे श्री वारणा महाविद्यालय वारणानगरची स्थापना करून पदवी पर्यंत शिक्षणाची सोय केली. १९८३ मध्ये अभियांत्रीकी महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पूर्व प्राथमिक-प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सोय केली.

तात्यासाहेबांच्या बरोबरीने स. आ. तथा बापूसाहेब गुळवणी, प्राचार्य आर. डी. शिंगटे, प्राचार्य महाबळेश्वरवाला, शंकरराव कुलकर्णी, नंदकुमार नाईक यांनी कष्ट घेऊन संस्था नावारूपाला आणली. सध्या आमदार विनय कोरे (सावकर), श्री. जी. डी. पाटील इ. मंडळी तात्यांचा शैक्षणिक वारसा पुढे चालवत आहेत.

## संदर्भ


१) प्रा. डॉ. गुरूनाथ नाडगोंडे : "अमृत तरंग", प्रकाशन मा. तात्यासाहेब कोरे अमृत महात्सव समिती, सन १९७४-८४ या दशकातील तात्यासाहेबांची भाषणे, पृष्ठ क्र. १३९.

२) प्रा. डॉ. गुरूनाथ नाडगोंडे : "अमृत तरंग", प्रकाशन मा. तात्यासाहेब कोरे अमृत महात्सव समिती, सन १९७४-८४ या दशकातील तात्यासाहेबांची भाषणे, पृष्ठ क्र. १४०.

३) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. ७०.

४) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २२१.

५) "वारणा विभाग शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल १९७६-७७", पृष्ठ क्र. २.

६) "प्राचार्य डॉ. आर. डी. शिंगारे अमृतमहोत्सव स्मरणिका", पृष्ठ क्र. २१.

७) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २२३.

८) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २२५.

९) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र.२२५.

१०) "४३ वा वार्षिक अहवाल १९९८-९९, श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. १५.

११) "श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे सन १९९९-२००० सालचा वार्षिक अहवाल ", पृष्ठ क्र. २४.

१२) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २२९.

१३) "४२ वा वार्षिक अहवाल १९९७-९८, श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. १०.

१४) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती उत्तरार्ध", पृष्ठ क्र.१७६.

१५) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती उत्तरार्ध", पृष्ठ क्र.१७९.

१६) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती उत्तरार्ध", पृष्ठ क्र.१८७.

****